ePaper

## लग्नासाठी मला उपमुख्यमंत्र्यांकडून धमकी: आदित्य ठाकरे



| वर्ष - 6 | अंक - 332 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



www.mahaenews.com | बुधवार, दि. 22मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महापालिकेत 'धाड'!

## लाचखोर लिपिक गजाआड : लाच लुचपत विभागाची कारवाई

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये काल दुपारी अडीच वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकली. त्यामध्ये पाणीपुरवठा विभागातील लिपिकास ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडे एक लाख रुपयांची रोकड सापडली. महापालिकेमध्ये प्रशासकीय राजवट सुरू आहे. प्रशासकीय काळामध्ये ठेकेदारांकडून कामे करून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पैशांची मागणी केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. पाणीपुरवठा विभागातील निविदेचे काम करण्यासाठी लिपिकाने एका ठेकेदाराकडे एक लाख रुपयांची मागणी केली होती. त्याबाबत संबंधित ठेकेदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.**



### » लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठ्या मास्यांना धडा शिकवावा : अजित गव्हाणे

### » पाणीपुरवठा विभागातील लिपीक हे लाचखोरीतील हिमनगाचे टोक

मंगळवारी दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून लिपिकास रंगेहाथ पकडले आहे. त्याची चौकशी अद्याप सुरू आहे.


दीड वर्षापुर्वी १८ ऑगस्ट २०२१ रोजी सुद्धा स्थायी समितीच्या बैठकीच्या दिवशीच एक लाख १८ हजार रुपयांची लाच घेताना थेट स्थायी समिती सभापती, त्यांचा पीए, दोन लिपीक व शिपाई अशा पाचजणांना अटक झाली होती. यामुळे स्थायीची सभा आणि एसीबीची धाड तथा कारवाई हे जणूकाही पिंपरी पालिकेत समीकरण बनू पाहत आहे.

दरम्यान, २०२१ च्या स्थायीच्या सभापतींवर तत्कालीन सत्ताधारी भाजपने कसलीच कारवाई केली नाही. उलट जामीनावर सुटका होताच त्यांना सभापतीपदी पुन्हा बसवले होते. तर, त्या लाचखोरीतील पालिकेचे चार कर्मचारीही सहा महिन्यांच्या निलंबनानंतर पुन्हा पालिका सेवेत रुजू झालेले आहेत. पिंपरी पालिकेत सध्या प्रशासकीय कारभार सुरु आहे. तरीही तेथील भ्रष्टाचार कमी झालेला नाही. प्रशासक तथा पालिका आयुक्त शेखरसिंह यांना नऊ महिन्यानंतरही जम बसवता आलेला नाही. त्यांची कर्मचारी व अधिकाऱ्यांवर जरब नसल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. यापूर्वीही पालिकेच्या मिळकतकर विभागात एसीबीची (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) कारवाई झाली होती.

या एवढ्या मोठ्या लाचेच्या प्रकरणात पाणीपुरवठा विभागाचे वरिष्ठही सहभागी असण्याची शक्यता आहे. त्यातूनच एसीबीने या विभागाच्या एका अधिकाऱ्याला स्थायीच्या बैठकीत जाऊन बाहेर बोलावून घेतले. त्याची चौकशी केली. मात्र, त्याने हात वर केल्याने त्याला तूर्तास जाऊ देण्यात आले आहे.

२०२१ आणि आजच्या २०२३ च्या पिंपरी पालिकेतील एसीबीच्या दोन्ही सापळ्यांच्या कारवाईमध्ये अनेक साम्ये आहेत. पालिकेत बळावलेला हा भ्रष्टाचार पालिकेच्याच दोन तरुण ठेकेदारांमुळे उजेडात आला. २०२१ ला एका होर्डिंग्ज ठेकेदारामुळे स्थायी समितीच्या भ्रष्ट कारभारावर शिक्कामोर्तब झाले होते. त्यांच्या मंजूर टेंडरची वर्क ऑर्डर काढण्यासाठी त्यावेळी त्यांच्याकडून स्थायीतून टक्केवारी मागितली गेली होती.

### भ्रष्टाचारावरून राष्ट्रवादी अन् भाजपमध्ये जुंपली



» महापालिकेतील या भ्रष्टाचाराला केवळ भाजपची सत्ता आणि त्यांचे नेतृत्त्व जबाबदार असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आजच्या लाचखोरीनंतर केला. भ्रष्टाचाराच्या हिमनगाचे आज पकडलेला लिपिक हे एक टोक असून तो करण्यास भाग पाडणारे अधिकारी आणि त्यांना राजकीय पाठबळ देणाऱ्या बड्या माशांना पकडावे, असे आव्हान त्यांनी 'एसीबी'ला (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) दिले आहे. भाजपच्या काळात खंडणीखोरी, लाचखोरी आणि भ्रष्टाचार मुळापर्यंत रुजला. गेल्या पाच वर्षांत ज्या पद्धतीने भ्रष्ट कारभार झाला त्याच पद्धतीने प्रशासकीय राजवटीतही कारभार सुरू आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला. राज्यात भाजपची सत्ता असल्याने प्रशासकावर भाजपच्या स्थानिक नेत्यांचा अंकुश आहे. त्यातूनच आपल्याला हवी तशी कामे करून घेण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे, असा आरोप त्यांनी नाव न घेता भाजपचे स्थानिक वजनदार नेते तथा शहर कारभाऱ्यांवर केला.

### वारंवार कारवाईमुळे शहराची बदनामी होतेय



» पिंपरी पालिकेच्या कारभारावर कोणाचेही नियंत्रण राहिलेलं नाही, असे आजच्या एसीबीच्या कारवाईतून स्पष्ट झाले असून वारंवार पडणाऱ्या त्यांच्या धाडीमुळे शहराची बदनामी होत आहे, असे पालिकेतील माजी विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक नाना काटे म्हणाले. पालिका भ्रष्टाचाराचे कुराण झाली असून प्रशासकीय राजवटीतही मनमानी कारभार सुरु आहे. त्यातून जनतेच्या पैशाची लूट होत आहे. चुकीच्या नेतृत्वाकडे शहराची सूत्र गेल्यानंतर काय होते, याची प्रचिती पिंपरी चिंचवडकरांना आजच्या घटनेसारखी वारंवार येत आहे, असे नाव न घेत त्यांनी भाजप व त्यांच्या कारभाऱ्यांनाच लक्ष्य केलं.

### प्रशासन व नेते मस्त! पिंपरी चिंचवडकर जनता त्रस्त!



» पाणीपुरवठाच नाही, तर बांधकाम परवाना, नगररचना, स्थापत्य, आरोग्य व वैद्यकीय, ड्रेनेज, भांडार, आदी सर्वच पालिकेच्या विभागात प्रचंड भ्रष्टाचार बळावला आहे, असा दावा माजी नगरसेवक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारूती भापकर यांनी केला. अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नत्या यामध्ये राजकीय नेते आपले हात धुवून घेत आहेत. त्यातून करदात्या पिंपरी चिंचवडकरांच्या तिजोरीवर दरोडा पडत आहे. दुसरीकडे तो रोखण्याची जबाबदारी असणारे प्रशासक तथा पालिका आयुक्त शेखर सिंह हे, मात्र ठेकेदार, बांधकाम व्यवसायिक, अधिकाऱ्यांच्या बैठकांत मश्गूल आहेत, अशी टीका त्यांनी केली.

# आ. धंगेकरांची विधानसभेत लक्षवेधी!

## 'कामाचा माणूस': 500 चौ. फुटाच्या आतील घरांना कर माफ व्हावा,पुणेकरांसाठी महत्त्वाची मागणी

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणेकरांसाठी जिव्हाळ्याचा विषय असलेला ५०० चौ. फुटाच्या आतील घरांना कर माफ करण्याचा निर्णय मुंबईच्या धर्तीवर लागू करावा, अशी विनंती कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी लक्षवेधीद्वारे विधानसभेत बोलताना शिंदे फडणवीस सरकारकडे केली.**



मुंबई शहरात ५०० चौ. फुटांच्या आतील घर असणाऱ्या मिळकत धारकांचा कर माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु पुणेकरांना देण्यात आलेली सवलत रद्द करुन त्याची वसुली करण्यात येत असल्याने पुणेकर नागरिकांत तीव्र असंतोषाची भावना आहे. हीच भावना लक्षात घेऊन राज्य शासनाने पुणे महापालिकेला वसुली थांबविण्याचे आदेश द्यावेत आणि पुणे शहरातील ५०० चौ. फुटाच्या आतील घरांना कर माफ करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी कसब्याचे नवनिर्वाचित आमदार रवींद्र धंगेकर यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

कसब्याचं मैदान मारल्यानंतर आमदार रवींद्र धंगेकर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपला सहभाग नोंदवला. पुणेकर नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला ५०० चौरस फुटांच्या आतील घरांना कर माफीचा विषय लक्षवेधीच्या माध्यमातून रवींद्र धंगेकर यांनी सभागृहाच्या पटलावर आणला. ५०० चौरस फुटांचे घर असणाऱ्या मिळकत धारकांचा कर माफ करावा, ही मागणी राज्य सरकारने मान्य न केल्यास याविरोधात शहरात आंदोलन करु, असंही धंगेकरांनी सांगितलं.

### धंगेकर यांनी 'लक्षवेधी'त काय म्हटलं?

» पुणे महानगरपालिकेने घरमालकांना देण्यात येणारी मिळत करातील ४० टक्के सवलत रद्द केल्याने याचा फटका हजारो पुणेकरांना बसत आहे. राज्यात दिवसेंदिवस महागाई वाढत असून महागाईमुळे पुणेकरांवरीलही खर्चाचा बोजा वाढत आहे. त्यातच मिळकत करात देण्यात येणारी ४०% सवलत बंद झाल्यामुळे पुणेकरांना मोठा आर्थिक फटका बसतोय. १९७० सालापासून सन २०१८ पर्यंत मिळालेला सवलत व्याजासहित पुणेकरांकडून वसुल करण्याचे आदेश देण्यात आल्याने यासंदर्भात पुणे म.न.पा ने वसुली व व्याज घेण्यावर स्थगिती द्यावी असा ठराव करून शासनाकडे पाठविला असतानाही याबाबत शुध्दीपत्रक शासनाने अद्यापही काढलेले नाहीये.

### पुणेकरांना दिलासा द्यावा

» मुंबई शहरात ५०० चौ. फुटांच्या आतील घरांना सवलत दिली जाते. परंतु पुणेकरांना देण्यात आलेली सवलते रद्द करुन त्याची वसुली करण्यात येत असल्याने पुणे शहरातील नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना लक्षात घेऊन राज्य शासनाने चौकशी करून सुरु असलेल्या वसुलीला स्थगित देऊन कर सवलत कायम करण्याची तसेच मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरातील ५०० चौ. फुटाच्या आतील घरांना कर माफ करण्याबाबत करावयाची आवश्यक शासनाने करावी आण पुणेकरांना दिलासा द्यावा.

---

# पुण्यात दस्त नोंदणीच्या महसुलाला 'ब्रेक'

## » सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाचा परिणाम, दस्त नोंदणीला गर्दीची शक्यता

। पुणे। महाईन्यूज ।

**आर्थिक वर्षाच्या अखेरीस दरदिवशी सुमारे अडीच हजार दस्तांची नोंदणी होत असते. मात्र, यंदा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे दस्त नोंदणीला फटका बसला आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतल्याने आता दस्त नोंदणीला गर्दी होण्याची शक्यता आहे.**




आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला (एक एप्रिल) चालू बाजारमूल्य दरांत (रेडीरेकनर) वाढ होण्याची शक्यता असल्याने जमीन, सदनिका यांच्या दस्त नोंदणीसाठी मार्चअखेरीस मोठी गर्दी होते. शहर आणि जिल्ह्यात दस्त नोंदणीच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत दररोज ६० ते ८० कोटी रुपयांचा महसूल जमा होत असतो. गेल्या सात दिवसांपासून सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या निवृत्ती वेतन योजनेच्या मागणीसाठी संप पुकारला होता. त्यामुळे शहरातील २८ पैकी सुमारे १३ कार्यालये बंद होती, तर ग्रामीण भागातील सर्व, २१ कार्यालये बंद होती. त्यामुळे दस्त नोंदणीच्या महसुलाला 'ब्रेक' लागला. पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात दररोज दीड ते दोन हजार दस्तांची नोंदणी होते, तर मार्चअखेरीस हा आकडा अडीच हजारांवर जातो आणि त्यातून सरकारला दररोज सरासरी ५० ते ७० कोटींचा महसूल मिळतो. ग्रामीण कार्यालयांमधून दररोज किमान दहा कोटींपेक्षा अधिक महसूल जमा होतो. मार्च महिना संपण्यास १० दिवस राहिले आहेत. त्यातच गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर दस्त नोंदणीला मिळणारा प्रतिसाद पाहता, सर्वच दस्त नोंदणी कार्यालयांत आता नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता व्यक्त आहे.

### कर्मचाऱ्यांचा जल्लोष

» पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील सर्वच सरकारी कर्मचारी जुन्या निवृत्ती वेतन योजनेसाठी बेमुदत संपावर होते. सोमवारी सेंट्रल बिल्डिंग येथे कर्मचाऱ्यांनी दिवसभर 'थाळी नाद' आंदोलन केले. सायंकाळी जुन्या निवृत्ती वेतन योजनेबाबत राज्य सरकारने तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानने संप मागे घेण्यात आला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला.

> राज्य सरकारने जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी, यासाठी तीन महिन्यांचा कालावधी मागितला आहे. त्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांनी केलेल्या एकत्रित संपाला अखेर यश मिळाले.
>
> \- मारुती शिंदे, अध्यक्ष, राज्य सरकारी कर्मचारी संघटना

---

# महावितरणचा 'झटका'!

## » पुणे परिमंडलातील 40 हजारांहून अधिक थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

। पुणे। महाईन्यूज ।

वारंवार आवाहन करूनही वीजबिलांच्या थकबाकीचा भरणा होत नसल्याने आर्थिक अडचणीत असलेल्या महावितरणकडून घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई वेगाने सुरू करण्यात आली आहे. गेल्या दीड महिन्याच्या कालावधीत पुणे परिमंडलातील ४० हजार ९१५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. पुणे परिमंडलातील ६ लाख ६ हजार ५६८ घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक ग्राहकांकडे मिळून १३२ कोटी ८९ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी आहे. यामध्ये पुणे शहरातील २ लाख ६५ हजार ३५८ ग्राहकांकडे ४४ कोटी ७८ लाख आणि पिंपरी चिंचवड शहरातील १ लाख २८ हजार ५ ग्राहकांकडे ३३ कोटी ८ लाख रुपये, तर ग्रामीणमध्ये आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांतील २ लाख १३ हजार २०५ ग्राहकांकडे ५५ कोटी ३ लाख रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे. महावितरणच्या महसुलाचा आर्थिक स्त्रोत प्रामुख्याने वीजबिलांची वसुली हाच आहे. वीज खरेदी, दैनंदिन देखभाल व दुरुस्ती खर्च, कर्जांचे हप्ते, कंत्राटदारांची देणी, आस्थापना हा सर्व खर्च वीजबिल वसुलीवरच अवलंबून आहे. मात्र, वीजबिलांच्या थकबाकीचा भरणा होत नसल्याने महावितरणकडून नाईलाजाने वीजपुरवठा खंडित करण्याच्या कटू कारवाईला वेग देण्यात आला. यात गेल्या दीड महिन्यात ४० हजार ९१५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

# साफसफाई करणाऱ्या महिलेला बेदम मारहाण!

## सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद, निगडी पोलिसांनी मात्र अदखलपात्र गुन्हा दाखल केला

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये पगार मागितल्यामुळे दुकान चालकाने साफसफाई करणाऱ्या महिलेला बेदम मारहाण केली आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला असून, निगडी पोलिसांनी मात्र अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. यामुळे पोलिसांविषयी नाराजी व्यक्त केली जात आहे. निगडी पोलिसांवर कोणाचा दबाव आहे का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.**



हर्षद खान असे मारहाण करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. त्याला निगडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, पीडित महिलेला आम्ही सहकार्य करू, अशी प्रतिक्रिया निगडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगनाथ उंडे यांनी दिली.

ही घटना गंभीर असतानादेखील निगडी पोलिसांनी मात्र अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. यामुळे निगडी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे. या घटनेकडे वरिष्ठ पोलीस अधिकारी लक्ष देऊन त्या महिलेला न्याय देतात का, हे पाहावे लागणार आहे.

### तोंडातून रक्तस्त्राव झाल्याचे सीसीटीव्ही कैद...

**मिळालेल्या माहितीनुसार, ४२ वर्षीय महिला सिटी प्राईड इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असणाऱ्या ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये साफसफाईचे काम करते. परंतु, ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये काम करणाऱ्या हर्षद खान याने गेल्या तीन महिन्यांपासून महिलेचा पगार दिलेला नाही. पीडित महिलेने अनेकदा त्याच्याकडे पगाराची मागणी केली. आज-उद्या असे म्हणून पगार देण्यास तो टाळाटाळ करत होता. आज सकाळी साडेदहाच्या सुमारास महिलेने हर्षद खानकडे पगार मागितला. यावरून दोघांमध्ये किरकोळ वाद झाला. रागात असलेल्या आरोपी हर्षदने ४२ वर्षीय महिलेला अश्लील शिवीगाळ करत बुक्क्यांनी तोंडावर बेदम मारहाण केली. या मारहाणीत महिला जखमी झाली असून तिच्या तोंडातून रक्तस्त्राव झाल्याचे सीसीटीव्हीमध्ये पाहायला मिळत आहे.**

---

# बलिदान दिनी वढू-तुळापूरला शंभूभक्तांची गर्दी

## छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन, शासकीय महाभिषेक

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा ३३४ वा स्मृतीदिन धर्माप्रति बलिदान दिन म्हणून मानला जातो. या निमित्त वढू-तुळापूर येथे विविध कार्यक्रम पार पडले. पुणे जिल्ह्यातून तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिव-शंभू भक्तांनी समाधीस्थळी गर्दी केली. शासकीय महाभिषेक आणि विविध कार्यक्रमांद्वारे संभाजीराजे यांना अभिवादन करण्यात आले.**

दरम्यान, भाजपाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पोलीस अधीक्षक अंकीत गोयल यांच्यासह प्रमुख अधिकारी, ग्रामस्थ, शिवप्रेमी यांनीही छत्रपतींच्या समधीचे दर्शन घेतले.

वढू ग्रामपंचायतीच्या सरपंच सारिका अंकुशराव शिंदे व उपसरंपच मारूती ओव्हाळ यांच्या हस्ते संभाजी महाराज यांची प्रतिमा देऊन जिल्हाधिकारी व एसपींचा सन्मान करण्यात आला. आमदार महेश लांडगे यांचाही सन्मान करण्यात आला. तर आमदार लांडगे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी व एसपींचा सन्मान करण्यात आला. यावेळी विविध गावचे पदाधिकारी उपस्थित होते.

मूक पदयात्रेच्या समारोप प्रसंगी भोसरी विधान सभेचे आमदार महेश लांडगे उपस्थित होते. दुपारी धर्मसभेला ‘सुदर्शन’ चॅनेलचे प्रमुख सुरेश चव्हाण तसेच आंतकवाद विरोधी पक्षाचे अखिल भारतीय प्रमुख मनिंदर सिंह गुप्ता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हेही उपस्थित होते.

ही सभा वढू ग्रामस्थ व धर्मवीर संभाजी महाराज कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.शिव प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने मूक पदयात्रा करण्यात येते. तर सभेचे दुपारचे आयोजन धर्मवीर संभाजी महाराज कृती समितीच्या वतीने तसेच वढू ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले.



### राज्यभरात मूक पदयात्रेद्वारे छत्रपतींचे स्मरण...

**वढू तुळापूर येथील छत्रपतींच्या समाधीस्थळी वढू ग्रामस्थांच्या वतीने पहाटे अभिषेक करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांची अंत्ययात्रा न झाल्यामुळे या ठिकाणी ५५ ते ६० गावांतील तरुणांनी मिळून संभाजी महाराजांचे स्मरण करत ‘मूक पदयात्रा’ काढण्यात आली. तालुका आणि तालुक्याबाहेरील विविध गावांतील युवकांनी या ठिकाणाहून ज्वाला प्रज्वलीत करून आपापल्या गावी घेऊन गेले. सायंकाळी आपापल्या गावी मूक पदयात्रा काढण्यात येणार आहे. पुणे जिल्हाधिकारी व पोलिस महासंचालक यांच्या उपस्थितीत शासकीय महापूजा करण्यात आली. त्यानंतर जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांचे कीर्तन पार पडले. सर्व शंभूभक्तांच्या हस्ते समाधीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.**

---

# दापोडीत नाल्यामध्ये राडारोडा टाकणाऱ्या तरुणाविरोधात पालिकेकडून गुन्हा दाखल...

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

दापोडीतील मुस्लिम दफनभुमीसमोरील नदीच्या किनाऱ्याजवळील नाल्यामध्ये आरोपीने (दि. २०) रोजी सकाळी १०.४५ च्या सुमारास ट्रॅक्टर (केए३३टीए७२५०) मधुन आणलेला पालापाचोळा व राडारोडा नाल्यामध्ये टाकला. त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले.

याप्रकरणी सचिन गुलाबराव जाधव (वय ४३ वर्षे, धंदा आरोग्य निरीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ह प्रभाग, कासारवाडी) यांनी आरोपी विजय रामु चव्हाण (वय २४ वर्षे, रा. बालाजी चौक, पाषाण) याच्या विरोधात फिर्याद दिली आहे.

भोसरी पोलिसांनी २३८/२०२३ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ चे कलम ३ नुसार आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



## संपादकीय

# आंदोलनांना जेव्हा जाग येते...

***महाराष्ट्रात नुकतीच दोन मोठी आंदोलने झाली. आता ती मागे घेण्यात आली असली तरी अशा प्रकारच्या आंदोलनांचे टायमिंग शंका निर्माण करते.***

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला सत्तेत येऊन आठ महिने झाले आहेत. या सरकारचा पहिलावहिला अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. त्यात शेतकऱ्यांना सहा हजार रुपये सन्मान निधी, एक रुपयात पीक विमा, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ, आशा सेविकांच्या मानधनात वाढ असे अनेक कल्याणकारी निर्णय घेतल्यामुळे या सरकारची सर्वसामान्यांकडून प्रशंसा होऊ लागली आहे. सत्तेत आल्या आल्या पेट्रोल आणि डिझेलवरील व्हॅट कमी करुन लोकांना दिलासा दिला. त्याचबरोबर नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना थेट अर्थसहाय्य दिले.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रेत्साहनपर अनुदान म्हणून ५० हजार रुपये देण्याची घोषणा महाविकास आघाडी सरकारने केली होती; मात्र ही घोषणा प्रत्यक्षात आणली नव्हती. शिंदे-फडणवीस सरकारने सत्तेत येताच हे काम करून टाकले. एकूणच या लोकाभिमुख कारभाराचा प्रत्यय येत असताना या सरकारच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू झाले आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या योजनेप्रमाणे निवृत्तिवेतन मिळावे, या मागणीसाठी कर्मचारी संघटना संपावर गेले. महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना गेल्या वर्षी विधिमंडळ अधिवेशनात जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा मुद्दा काही लोकप्रतिनिधींनी मांडला. तत्कालिन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना जुनी योजना लागू करणे शक्य नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. त्यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात आंदोलने झाली नव्हती. संपाचे आवाहनही कुणी केले नव्हते.

जुन्या योजनेप्रमाणे पेन्शन मिळणार नाही, असे ठणकावून सांगणाऱ्या अजित पवार यांचा निषेधही कोणी केल्याचे ऐकिवात नाही. ते सरकार गेल्यानंतर मात्र थेट संपाचे अस्त्र बाहेर काढण्यात आले. संप सुरूही झाला.

# ब्रेक हवाय?






ऑफिस, घरच्या जबाबदाऱ्या आणि मुलांचे संगोपन यात एकदा का गुरफटत गेले, की स्वतःसाठी आणि वैवाहिक नाते आणखी फुलवण्यासाठी वेळ नसल्याचे चित्र अनेक घरांमध्ये सध्या दिसून येते आहे. घड्याळ्याच्या काट्यावर सुरू झालेला आणि संपलेला दिवस स्वतःसाठी म्हणून उरतच नाही, तेव्हा हातून काही तरी निसटते आहे, अशी भावनाही जोडप्यांमध्ये निर्माण होत आहे. केवळ जोडपीच नाही, तर ऑफिस, कॉलेज डेडलाइनच्या चक्रात अडकलेले बॅचरलही 'आय नीड अ ब्रेक' सारख्या व्हॉट्स-अॅप, फेसबुक स्टेटसमधून आपली व्यथा मांडताना दिसताहेत.

हेच सांगणारी एक जाहिरात मध्यंतरी दिसत होती. ऑफिसची वेळ गाठता यावी म्हणून ती घरातली कामं भराभर आवरत असते. मुलांचा नाश्ता, त्यांच्या शाळेची तयारी करत असताना अचानक बेल वाजते. ऑफिसचा फोनही खणाणतो. आधी फोन घेते आणि त्यावर बोलत-बोलत दार उघडून धोब्याकडून कपडे घेते. फोनवर बोलण्याच्या नादात ते कपडे कपाटात जाण्याऐवजी ती चक्क फ्रीजमध्ये ठेवायला जाते आणि एकदम भानावर येते. काही तरी चुकते आहे, या जाणीवेने ती काही वेळ 'हँग'ही होते.

आपण शरीरानेच नुसते पळतोय, मनाने काम करणे मात्र कधीच थांबवले आहे, असा काहीसा आशय ही जाहिरात मांडते. तुमच्याबाबतीत कधी असे झाले आहे? झाले असेल, तर वैयक्तिक, वैवाहिक आयुष्यात 'रिस्टार्ट' होण्याची गरज आहे हे ओळखा. खरं तर, आपल्याला ब्रेकची गरज आहे आणि मोठ्या सुट्टीशिवाय तो कसा घ्यायचा हे नेमके लक्षात येत नाही. रूटिन बदलूनही हा ब्रेक मिळू शकतो. याचा विचार न करता राग एकमेकांवर काढून उगाचच वाद घातला जातो. ऑफिससाठी प्रवास, त्याच्या टार्गेटमधून येणारा ताण यामुळे बाहेरूनच वैतागून घरी येणे होते आणि त्यामुळे 'रिलेशनशिप टॉलरन्स'ही एकदम कमी होतोय.

असा घ्या ब्रेक

१. ठरलेल्या वेळेपेक्षा जरा लवकर उठा. जोडीदारासाठी चहा-कॉफी बनवा. गॅलरीत निवांत बसून त्याचा आस्वाद घेत गप्पा मारा.

२. ऑफिसमधील आजच्या कामाचा आढावा घ्या. तो आटोक्यात असेल किंवा आपण न जाऊन चालणार असेल, तर सरळ दांडी मारा आणि लाँग ड्राइव्हसाठी बाहेर पडा.

३. घरात मूल असेल, तर त्याला शाळा, क्लासच्या तयारीसाठी त्याला स्वावलंबी बनवा. यामुळे तुम्हाला बराच वेळ मिळेल. म्हणजे, स्वतःच ब्रश करणे, अंघोळ करणे, रात्री दप्तर भरून ठेवणे, टिफिन भरणे, गणवेश घालणे इत्यादी.

४. ऑफिसमधून कधी तरी लवकर बाहेर पडा आणि जोडीदाराला सरप्राइज द्या. तो/ती ऑफिसला जात असेल, तर त्याच्या ठिकाणी जाऊन सोबत चहा, कॉफी घ्या.५. नवीन काही तरी शिका.

६. संगीत ऐका.

७. घरातला पसारा आवरा. तुम्ही म्हणाल, कसला आलाय हा ब्रेक; पण हे खरंय. घरातला पसारा आवरला, तर मनातली जळमटे, नैराश्यही साफ होते आणि आनंद मिळतो. हा अनेकांचा अनुभव असेलही.

८. ऑफिसमधल्या टेबल, ड्रॉव्हरची साफसफाई करा. फूल, फ्रेम अशा प्रसन्न वस्तूंनी टेबल सजवा.

९. ऑफिसला दुचाकी, चारचाकीने जात असाल, तर नेहमीचा जाण्या-येण्याचा रस्ता बदलून पाहा.

१०. एखाद्या सांजवेळी टेकडी किंवा पुलावर जा. सूर्यास्त अनुभवा.

११. सोशल नेटवर्किंगचा वापर कमी करा. एकटे असतानाही आणि जोडीदार असतानाही. निसर्गात रमा.

१२. मित्र-मैत्रीणींना आवर्जून भेटायला जा.

१३. व्यायाम योगासनांची सवय नसेल, तर ती लावून घ्या. यामुळे दिवसाची सुरुवात प्रसन्न होईल.

१४. लहान मुलांमध्ये रमा.

१५. बायकोसाठी स्वतःहून जेवण बनवा. घरच्या घरी कँडल लाइट डिनरची सोय करा.

१६. लहान मुलांच्या गोष्टींची पुस्तके वाचा. कविताही वाचा. कोडी सोडवा.

१८. बॉडी मसाज, बॉडी स्पा, हेअर स्पामधून स्वतःचे लाड करा.

१९. मेकओव्हर करून पाहा. हेअरस्टाइल, ड्रेसिंग स्टाइल बदलून पाहा.

# चेतना तरंग : गुढीपाडवा

**वसंत ऋतू म्हणजे नव्या उत्साहाने आणि चैतन्याने निसर्गात सर्व काही नव्याने सुरू होण्याचा काळ. भारतातील अनेक भागांत, वसंत ऋतूतील सर्वांत मोठ्या दिवसाच्या आसपास येणाऱ्या प्रतिपदेला नवीन वर्ष साजरे केले जाते.**

कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणात याला उगाडी म्हणतात, तर महाराष्ट्रात गुढीपाडवा. सिंधी लोक याला चेट्टी चांद म्हणतात, तर मणिपुरी लोक साजीबू नोंगमा पानबा म्हणतात. बाली आणि इंडोनेशियामधील हिंदू नेईपी म्हणतात.

निसर्गाप्रमाणेच आपणही भूतकाळातील सर्व नकारात्मकता टाकून देऊन नवीन उत्साहाने पुढे जाण्याची हीच वेळ आहे. जेव्हा आपली भावना बळी पडल्याची किंवा अपराधीपणाची असेल, तेव्हा असे करणे अवघड होते. नवीन वर्ष साजरे करणे म्हणजे काळ, मन, आणि स्वत:चा सन्मान करणे आणि स्वत:चा सन्मान करणे म्हणजे आपण बळीही पडलेलो नाही आणि अपराधीही नाही, हे जाणणे. तुमच्या हातून काहीतरी चूक होते, तेव्हा तुम्हाला अपराधी आणि पापी वाटायला लागते. मग तुम्हाला मनातून अजिबात शांत वाटत नाही. तुम्ही हे समजून घ्यायला हवे, की तुम्ही वैश्विक प्रेमाचा



प्रकाश आणि ठिणगी आहात. हे तेव्हाच होईल जेव्हा तुम्ही अपराधी भावनेतून बाहेर याल.

दुसरीकडे, आपल्याला असे वाटले की आपण बळी पडला आहात, तर आपण कधीही जीवनाचे सत्य बघू शकणार नाही. येथे राहण्याचा उद्देश म्हणजे, प्रेम, आनंद आणि बुद्धी हे जीवनाचे सर्व पैलू व्यक्त करणे. तुम्ही परिस्थितीचे, काळाचे आणि इतर लोकांचे बळी झाला आहात असे तुम्हाला वाटते, तेव्हा तुम्ही जीवन एक उत्सव म्हणून खऱ्या अर्थाने उपभोगू शकणार नाही. जीवन हे कडू-गोड अनुभवांचे मिश्रण आहे याची आठवण राहावी म्हणून, कर्नाटकात लोक उगाडीला कडूनिंबाची पाने आणि मिठाई खातात. आनंददायी आणि अप्रिय दोन्ही. अप्रिय गोष्टी तुम्हाला अंतर्मुख बनवतात. त्या तुम्हाला आणि त्याने तुमच्या मनाला एक सखोलता प्राप्त होते आणि तुमचे व्यक्तिमत्त्व खुलते.सर्व तक्रारी सोडून द्या आणि त्या सर्व कटू दिवसांचे धन्यवाद माना कारण त्यांनी तुम्हाला बळ दिले आहे. आनंददायी दिवसांनी तुम्हाला तुमच्या खऱ्या क्षमतेची जाणीव करून दिली आणि तुम्ही स्वत: जो आनंद आहात तो व्यक्त करण्याची संधी दिली! आनंददायी आणि अप्रिय दोन्हीचे धन्यवाद मानण्याने आपण बळी पडल्याच्या भावनेतून बाहेर पडतो. आनंदी होण्याचा आणि आनंद पसरविण्याचा निश्चय करून येत्या नवीन वर्षाचे आपण स्वागत करूयात. एकूण लोकसंख्येपैकी एक टक्का लोकांनी ध्यान केले तरी बाकीच्या ९९ टक्के लोकांना त्याचा फायदा होतो. या वर्षी आपण सर्वांनी ध्यान करून ज्ञानरूपी खजिना जपूया.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।  
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥  
कां रे सिणलासी वाउगा ।  
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# संजय राऊतांवर शरसंधान!

## “राज्याची कायदा-सुव्यवस्था कोठ्यावर नाचते”, संजय राऊतांच्या टीकेला दीपक केसरकरांचं प्रत्युत्तर

। मुंबई। महाईन्यूज ।

**राज्याची कायदा-सुव्यवस्था काही लोकांच्या कोठ्यावर नाचते आहे, अशी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज दिल्लीत माध्यमांशी बोलताना केली होती. या टीकेला शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. संजय राऊतांचं बोलणं हे नेहमीच खालच्या पातळीवरचं असतं, असं ते म्हणाले. विधिमंडळ परिसरात त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. राज्याची कायदा-सुव्यवस्था काही लोकांच्या कोठ्यावर नाचते आहे, अशी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज दिल्लीत माध्यमांशी बोलताना केली होती. तर यावर विधानसभेत बोलताना दादा भुसे यांनी स्पष्टीकरण देत संजय राऊतांवर हल्लाबोल केला आहे.**





“आम्हाला वारंवार गद्दार म्हणणारे आणि आमच्याच मतांवर राज्यसभेवर निवडून गेलेल्या संजय राऊतांनी काल एक ट्वीट केलं. जगाच्या पाठीवर असलेल्या कोणत्याही यंत्रणेच्या माध्यमातून या ट्वीटची चौकशी करण्यात यावी. “त्या चौकशीत मी दोषी आढळलो, तर आमदारकी आणि मंत्रीपदाचा राजीनामा देत राजकारणातून निवृत्त होईल. जर यात खोट आढळून आलं, तर या महागद्दारांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा द्यावा,” असे आव्हान दादा भुसे यांनी दिलं आहे.

### संजय राऊत नेमकं काय म्हणाले होते?

बार्शीतील प्रकरणी संजय राऊतांनी पीडित मुलीचा फोटो ट्वीट केला होता. त्यानंतर संजय राऊतांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यावरून त्यांनी शिंदे सरकार जोरदार टीका केली. “मी त्या मुलीचं नाव, तिच्यावर झालेल्या अत्याचारांविषयी काहीही बोललेलो नाही. फक्त ‘माननीय मुख्यमंत्री या मुलीचं सांडलेलं रक्त वाया जाऊ देऊ नका’ इतकंच म्हटलं. यावर जर माझ्यावर गुन्हा दाखल होणार असेल, तर राज्यातला कायदा कोणत्या पद्धतीने काम करतोय, हे स्पष्ट दिसेल. आपल्या कुटुंबातील व्यक्तीसाठी एसआयटी स्थापन कली जाते. एका चुंबन प्रकरणाच्या व्हिडीओवरून एसआयटी स्थापन केली जाते. पण मी एका रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या एका मुलीचा फोटो ट्वीट करून मुख्यमंत्र्यांना आवाहन केलं म्हणून माझ्यावर गुन्हा दाखल होतो. एका खासदारावर, एका पत्रकारावर गुन्हा दाखल होतो. या राज्याची कायदा-सुव्यवस्था कशी काही लोकांच्या कोठ्यावर नाचतेय ते यातून स्पष्ट दिसतंय”, असे ते म्हणाले होते.

संजय राऊत ट्वीट करत म्हणाले, “हे आहेत मंत्री दादा भुसे. शेतकरी त्यांच्याविरोधात रस्त्यावर आले आहेत. गिरणा ॲग्रो नावाने १७८ कोटी २५ लाखांचे शेअर्स शेतकऱ्यांकडून गोळा केले. पण, कंपनीच्या वेबसाईटवर केवळ १ कोटी ६७ लाखांचे शेअर्स केवळ ४७ सभासदांच्या नावावर दाखवले. ही लूट आहे. लवकरच स्फोट होईल’, असा संजय राऊतांनी सांगितलं. ईडी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राऊत यांनी या ट्विटमध्ये टॅग केलं आहे.

### काय म्हणाले दीपक केसरकर?

**संजय राऊतांचं बोलणं हे नेहमीच खालच्या पातळीवरचं असतं. हल्ली कोणीही संजय राऊतांची दखल घेत नाही. आज त्यांना राज्यात कोणीही किंमत देत नाही, असं प्रत्युत्तर दीपक केसरकर यांनी दिलं. पुढे बोलताना, राऊतांनी आमदार कुल आणि दादा भुसेंवर केलेल्या आरोपांबाबतही प्रतिक्रिया दिली. भ्रष्टाचार केल्याच आरोप करणं हा एक भाग असतो आणि त्यात काही तथ्य असणं ही वेगळी गोष्ट असते. त्यामुळे त्यांनी केलेल्या आरोपावर संबंधित नेते उत्तर देतील. फक्त राजकारण म्हणून कोणाला तरी बदनाम करण्याच प्रयत्न होऊ नये. कारण महाराष्ट्राचं राजकारण नेहमी जनतेच्या हिताचं राहिलं आहे. पण आज ते व्यक्तिगत पातळीवर उतरत आहे, यापेक्षा दुर्दैवी गोष्ट नाही, असेही ते म्हणाले.**

### “26 मार्चपर्यंत माफी मागावी, अन्यथा...

.शिवसेना ( ठाकरे गट ) खासदार संजय राऊत यांनी मोठा बॉम्ब फोडला आहे. संजय राऊत यांनी शिवसेना मंत्री ( शिंदे गट ) दादा भुसे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. मंत्री दादा भुसे यांनी कोट्यवधींचा घोटाळा केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. याबाबत संजय राऊत यांनी ट्वीट केलं आहे. भाजपा आमदार राहुल कुल यांच्यानंतर दादा भुसे यांच्यावर संजय राऊतांनी केलेल्या आरोपांवरून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. “२६ मार्चपर्यंत माफी मागावी, अन्यथा ”, संजय राऊतांच्या ‘त्या’ आरोपांवरून दादा भुसेंनी इशारा दिला आहे. दादा भुसे म्हणाले की, “हे भाकरी ‘मातोश्री’ची खातात आणि चाकरी राष्ट्रवादी आणि शरद पवारांची करतात. संजय राऊतांनी मालेगावच्या नागरिकांची आणि महाराष्ट्राची माफी मागावी. २६ मार्चपर्यंत माफी मागितली नाही, तर बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंचे शिवसैनिक त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही,” असा इशारा दादा भुसे यांनी दिला आहे.

# मुंबई, कल्याण डोंबिवलीसह विविध उपनगरांमध्ये अवकाळी पावसाच्या सरी!

## छत्री घेऊन ऑफिस गाठताना चाकरमान्यांची त्रेधा, मार्च महिन्यात मुंबईकरांना छत्री घेऊन जावे लागतेय

। मुंबई। महाईन्यूज ।

मुंबई, ठाण्यासह राज्यभरात अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. आत्ताही काही भागांमध्ये रिमझिम पाऊस सुरू आहे. मार्चमधल्या प्रचंड उकाड्यामुळे हैराण झालेल्या मुंबईकरांना काही अंशी दिलासा मिळाला असला तरीही अवकाळीने शेतकऱ्याची झोप उडवली आहे. तसंच कामावर जाणाऱ्या मुंबईकरांचीही तारांबळ उडाली आहे. मार्च महिन्यात सकाळी सकाळी मुंबईकरांना छत्री घेऊन ऑफिस गाठावं लागतं आहे.

### कल्याण डोंबिवलीत दमदार सरी

कल्याण डोंबिवलीत मंगळवारी पहाटे साडेपाच वाजल्यापासून ठिबकणाऱ्या अवकाळी पावसाने साडे सहा वाजता विजांच्या कडकडाटासह दमदार हजेरी लावली. सकाळीच कामावर निघालेल्या नोकरदार, वृत्तपत्र विक्रेते ते शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची तारांबळ उडवली.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात पहाटेपासून आवारात उघड्यावर भाजीपाला ठेऊन विक्री व्यवहार करणारे विक्रेते, खरेदीदार, वाहन चालकांची



अवकाळी पावसाने भंबेरी उडवली. उघड्यावर ठेवलेला भाजीपाला, फळे, फुले झाकून ठेवण्यासाठी विक्रेत्यांना धावपळ करावी लागली. बाजारपेठांमध्ये सकाळचे व्यवहार होत असलेल्या ठिकाणी चहा, नाश्ता मंचकावर ठेऊन नियमित व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना इमारती, निवाऱ्याचा आडोसा घ्यावा लागला. वृत्तपत्र विक्रेत्यांना काही वेळ इमारतींचा आडोसा घेऊन वर्तमानपत्र भिजू नये म्हणून काळजी घ्यावी लागली.

मुंबई आणि ठाण्याप्रमाणेच पालघर आणि डहाणूमध्येही वीजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे रब्बी पिकांचं आणि बागायची शेतीचं मोठं नुकसान होण्याची चिन्हं आहेत. शेतकरी आधी झालेल्या अवकाळी पावसामुळे संकटात सापडला आहे अशात पुन्हा एकदा राज्यात अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. बुलढाणा, परभणी, सातारा, धुळे, वर्धा, अमरावती या जिल्ह्यांमध्येही अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे.

### मुंबई, ठाण्यासह कल्याणमध्येही पावसाच्या सरी

**मुंबईसह ठाणे जिल्ह्यात पावसाच्या सरी कोसळल्या. अंधेरीमध्ये जोरदार पाऊस झाला. त्याचप्रमाणे जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहीसर या भागांतही पाऊस सुरू आहे. तसंच दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या उपनगरांमध्येही पाऊस पडतो आहे. काही वेळ पावसाने विश्रांती घेतली असली तरीही पावसाच्या सरी येत आहेत. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं मात्र मोठं नुकसान झालं आहे.**

# दिल्ली-NCR मध्ये भूकंपाचे जोरदार धक्के!

## जमीन दोनदा हादरली, भूकंपाची तीव्रता 6.6

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।


दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. किमान दोनदा भूकंपाचे धक्के जाणवले. सुमारे १० सेकंद जमीन हादरत राहिली. त्यामुळे लोक घाबरून घराबाहेर पडले होते. दिल्लीसह हरियाणा, पंजाब, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचे केंद्र अफगाणिस्तानात असल्याचे सांगण्यात येत आहे. भूकंपाची तीव्रता ६.६ इतकी मोजण्यात आली आहे.

रात्री १० वाजून २० मिनिटांनी बहुतेक लोक झोपण्याच्या तयारीत व्यस्त होते. मात्र अचानक जमीन हादरली. प्राथमिक माहितीत या भुंकपाच्या धक्यांमध्ये कोणतेही नुकसान झाल्याची माहिती नाही.

दिल्ली-एनसीआरमधील उंच इमारतींमध्ये लोक प्रचंड घाबरले आहेत. लोक त्यांचे अनुभव सोशल मीडियावर शेअर करत आहेत.

दिल्ली-एनसीआरमध्ये यावर्षी तिसऱ्यांदा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. अचानक सर्व काही हलू लागल्याने लोक भयभित झाले आहेत. त्यामुळे लोक कुटुंबासह घाईघाईने घराबाहेर पडला. एक मिनिटापेक्षा जास्त काळ भूकंपाचे धक्के जाणवल्याचे माहिती लोक सोशल मीडियावर सांगत आहेत.





### कोणतेही नुकसान नाही

» रात्री १० वाजून २० मिनिटांनी बहुतेक लोक झोपण्याच्या तयारीत व्यस्त होते. मात्र अचानक जमीन हादरली. प्राथमिक माहितीत या भुंकपाच्या धक्यांमध्ये कोणतेही नुकसान झाल्याची माहिती नाही.

# "चोर तर चोर वर शिरजोर...

## भाजप नेत्याची राहुल गांधींवर टीका

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

काँग्रेस नेते राहुल गांधी हे मागील काही दिवसांपासून लंडनमध्ये केलेल्या विधानावरून भाजपच्या निशाण्यावर आहेत. भाजप अजुनही राहुल गांधींच्या माफीनाम्यावर ठाम आहे. तर काँग्रेसने स्पष्ट केलं की, राहुल गांधी यांनी असं कोणतही विधान केलं नाही, की ज्यामुळे माफी मागावी. यावरून भाजपनेते आणि केंद्रीयमंत्री अनुराग ठाकूर यांनी राहुल गांधींवर टीकेची झोड उठवली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी म्हटलं की, राहुल गांधी यांनी परदेशातून भारतावर वारंवार हल्लाबोल करणे, खोटे बोलणे, देशाची बदनामी करून माफीही न मागणे हे 'चोर तर चोर पुन्हा शिरजोर, असंच आहे. संसदेचे कामकाज व्यवस्थित चालावे, अशी आमची इच्छा आहे, पण राहुल गांधी यांनी माफी मागावी, असं ठाकूर म्हणाले.

अनुराग ठाकूर पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्ष लडाख आणि अरुणाचल प्रदेशला भारताचा भाग मानत नाही का? त्यावर राहुल यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. राहुल म्हणतात, लोकशाही संपत चालली आहे. खरे तर भारतातून काँग्रेस पक्ष संपून चालला आहे. संसदेत बोलण्याची संधी मिळत नाही, असे



### शॉर्ट न्यूज

**"मोदींनी दिल्लीचा अर्थसंकल्प रोखला",**

**दिल्ली :** आज दिल्ली विधानसभेत अर्थसंकल्प मांडला जाणार होता. मात्र, केंद्र सरकारने हा अर्थसंकल्प रोखला असल्याचे सांगण्यात येत आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहिराती, भांडवली खर्च आणि आयुष्मान भारत सारख्या मुद्द्यांवर दिल्ली सरकारकडून स्पष्टीकरण मागितले असल्याची माहिती आहे. दरम्यान, यावरून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिले आहे. देशाच्या इतिहासात असा प्रकार कधीच घडला नाही, असे केजरीवाल यांनी पत्रात म्हटलं आहे. एनडीटीव्हीने याबाबतचे वृत्त दिले आहे. पीटीआयला प्रतिबंधित संघटना जाहीर करण्यासाठी प्रक्रिया सुरू करता येईल काय, याबाबत सरकार कायदेतज्ज्ञांशी विचारविनिमय करेल, असे सनाउल्ला यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

# विद्यमान आमदार, खासदारांना निवडणुकीसाठी उमेदवारी नाही!

## छत्तीसगढ राज्यातील धर्मांतर रोखण्यासाठी बस्तरमधील ग्रामसभेचा अजब ठराव

। बंगळूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी भाजपचे डझनहून अधिक खासदार आणि विधान परिषदेचे सदस्य विधानसभा निवडणूक लढवायची इच्छा व्यक्त केली असली तरी भाजप हायकमांडने मात्र त्याला होकार दर्शवलेला नाही. लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषदेचे सदस्य राजीनामा देऊन किंवा त्याशिवाय विधानसभा निवडणूक लढले आणि ते जिंकले तर ते आपल्या पदाचा राजीनामा देतील.

मात्र यावेळी काही जणांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे निवडणुकीत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली असली तरी भाजप हायकमांडने कोणालाही परवानगी दिलेली नाही. लोकसभा आणि विधान परिषदेत काही विधेयके मंजूर होत नाहीत. त्यामुळे एक एक जागा महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे हायकमांडचे मत आहे.

त्यामुळे विधानसभा निवडणुकीत सहभागी होण्यासाठी वर्षभरापासून पडद्याआडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कसरत करणाऱ्या इच्छुकांची निराशा होण्याची शक्यता



आहे. कारण २२४ विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही लोकसभा, राज्यसभा व परिषदेच्या सदस्यांना विधानसभा निवडणुकीची उमेदवारी मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. खासदार शिवकुमार उदासी, जी. एम. सिद्धेश्वर, पी. सी. मोहन, प्रताप सिंग, करडी संगण्णा, पी. सी. गद्दीगौडर, रमेश जिगजिनगी, डी. व्ही. सदानंद गौडा, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, शोभा करंदलाजे, ए. नारायणस्वामी, प्रदेश भाजप अध्यक्ष नलिनकुमार कटील यांनी राष्ट्रीय राजकारणातून राज्याच्या राजकारणात येण्याचा मानस पक्षश्रेष्ठींकडे व्यक्त केला आहे. भाजपमधील मोठ्या संख्येने खासदार विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक असले तरी पक्ष हायकमांड त्याला परवानगी देण्यास तयार नाही. हायकमांडने सहमती दर्शवल्यास भाजपचे दहाहून अधिक खासदार विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत.



# मृणालचं झालं ब्रेकअप?

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल ठाकूर ही कोणत्याही वेगळ्या ओळखीवर अवलंबून नाही. छोट्या पडद्यापासून ते मोठ्या पडद्यापर्यंत आपल्या दमदार अभिनयामुळे मृणाल ठाकूरने स्वतःसाठी एक खास स्थान निर्माण केले आहे.

दरम्यान, मृणाल ठाकूरचा एक लेटेस्ट फोटो सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये मृणाल ठाकूर रडताना दिसत आहे. मृणाल ठाकूरने या फोटोद्वारे आपली व्यथा मांडली आहे.

मंगळवारी, मृणाल ठाकूरने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर स्टोरीमध्ये एक लेटेस्ट फोटो शेअर केला. मृणाल ठाकूरच्या या इन्स्टा स्टोरी फोटोमध्ये ती रडताना दिसत आहे.या फोटोसोबत मृणाल ठाकूरने लिहिले आहे की- 'कालचा दिवस कठीण होता, पण आज मी अधिक मजबूत, समजदार आणि आनंदी आहे, प्रत्येकाच्या कथांची अनेक पाने आहेत, परंतु प्रत्येकजण त्या मोठ्याने वाचत नाही, पण मी माझ्या कथेची पाने मोठ्याने वाचणे निवडत आहे". अशाप्रकारे मृणाल ठाकूरने मनातील गोष्ट सांगितली आहे. मात्र, या फोटोनंतर लगेचच मृणाल ठाकूरनेही इन्स्टा स्टोरीमध्ये एक व्हिडिओ अपलोड केला आहे, ज्यामध्ये ती म्हणताना दिसत आहे की- "काल मला खूप वेगळं आणि असहाय्य वाटत होते. पण आज मी खूप आनंदी आहे".

# टॉलीवूडच्या किर्तीनं चित्रपटाच्या टीमला वाटली सोन्याची नाणी!



अभिनेत्री कीर्ती सुरेश ही लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेत्री आहे. जरी ती साउथ चित्रपटात दिसत असली तरी तिचा चाहता वर्ग हा खुप मोठा आणि जगभर पसरला आहे. कीर्ती तिच्या 'दसरा' या चित्रपटामुळे चर्चेत आहे.नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलिज झाला आहे. यात कीर्ती नानीसोबत दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असुन आता प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे. दरम्यान 'दसरा' च्या सेटवर अभिनेत्री कीर्तीने असं काही केलयं की तिचं सर्वत्र कौतुक होत आहे.कीर्ती सुरेश तिच्या 'दसरा' चित्रपटातील कामगिरीने इतकी खूश झाली की तिनं चक्क प्रत्येकी 10 ग्रॅमची 130 सोन्याची नाणी चित्रपटाच्या युनिट टिमला वाटली.IANS मधील वृत्तानुसार, कीर्ती सुरेशला वाटले की तिने 'दसरा' मध्ये तिच्या कारकिर्दीचा सर्वोत्तम परफॉर्मन्स देणाऱ्या लोकांसाठी काहीतरी खास करावं. इतकेच नाही तर चित्रपटाच्या शूटिंगच्या शेवटच्या दिवशी कीर्ती सुरेशही खुप भावुकही झाली होती. मग त्यानंतर तिने चित्रपटाच्या टीमला सोन्याची नाणी वाटण्याचा करण्याचा निर्णय घेतला. वृत्तानुसार, कीर्ती सुरेशने चित्रपटाच्या टीमला 70-75 लाखांची सोन्याची नाणी वाटली.'दसरा' मूळतः तेलुगू भाषेतील चित्रपट आहे, पण तो संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे.

# जन्मताच राणी मुखर्जीची झालेली अदलाबदली



आज खंडाला गर्ल राणी मुखर्जीचा वाढदिवस. राणीने आजवर अनेक सिनेमांमधून तिच्या अभिनयाची चुणूक दाखवली. राणीच्या वाढदिवसाच्या आठवड्यात तिचा नवा सिनेमा मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे सिनेमा रिलीज झालाय.आज राणी मुखर्जीच्या वाढदिवसानिमित्त एका खास गोष्टीचा उलगडा झालाय. ती घटना म्हणजे राणी मुखर्जीच्या जन्माची..

राणी मुखर्जीच्या जन्माच्या वेळी तिची अदलाबदल झाली आहे. याचा खुलासा खुद्द राणी मुखर्जीने केला आहे.अभिनेत्रीने मुलाखतीत सांगितले होते की, तिचा जन्म झाला तेव्हा हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाच्या कारभारामुळे चुकून एका पंजाबी जोडप्याच्या खोलीत पोहोचली होती.राणीच्या आईला या गोष्टीमुळे मोठा धक्का बसला होता. राणीने हि सर्व घटना मुलाखतीत उलगडली.राणी म्हणाली, जेव्हा तिच्या आईला समजले कि तिच्या बाळाची अदलाबदली झाली. आपल्या शेजारी असलेल्या बाळाला पाहिले तेव्हा त्यांना जाणीव झाली कि ते तिचे मूल नाही. मग पुढे राणीच्या आईने डॉक्टरांना सांगितले की, तिच्या मुलीचे डोळे तपकिरी आहेत.या एका गोष्टीमुळे राणी मुखर्जीच्या आईने डॉक्टरांना आपल्या मुलाचा शोध घेण्यास सांगितले होते. मुलाचा शोध घेता घेता तिच्या आईने एका पंजाबी कुटुंबात भेट घेतली.राणीची आई ज्या पंजाबी कुटुंबाला भेटली होती त्या पंजाबी कुटुंबात आठव्यांदा मुलगी जन्माला आली असा समज झाला. पण मुलीच्या तपकिरी डोळ्यांमुळे आईला ओळख पटली आणि तिला तिची मुलगी परत मिळाली.हा सर्व किस्सा सांगताना राणी म्हणाली, आजही तिचे कुटुंबीय तिला गमतीने सांगतात की ती पंजाबी आहे आणि ती चुकून त्यांच्याकडे आली आहे. राणी ही फिल्ममेकर राम मुखर्जी यांची मुलगी आहे आणि तिचे लग्न यश चोप्रा यांचा मुलगा दिग्दर्शक आदित्य चोप्राशी झाले आहे. आपल्या उत्कृष्ट अभिनयाने, आवाजाने आणि आपल्या सौंदर्याने वर्षानुवर्षे चाहत्यांची मने जिंकणारी अभिनेत्री राणी मुखर्जी 21 मार्च रोजी आपला 44 वा

# रेल्वे स्टेशनवर झालेल्या मैत्रीचं रुपांतर प्रेमामध्ये



हिंदी चित्रपटसृष्टीतील (BOLLYWOOD) प्रसिद्ध गायिका अलका याज्ञिक (ALKA YAGNIK) या त्यांच्या आवाजानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकतात. अलका यांनी अनेक हिट गाणी गायली आहेत. अलका यांची गाणी फक्त भारतातीलच नाही तर जगभरातील प्रेक्षक आवडीनं ऐकतात. अलका यांचा आज 57 वा वाढदिवस आहे. अलका यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेकांना माहीत नसेल. गायिका अलका याज्ञिक आणि नीरज कपूर यांनी 1989 मध्ये लग्न केलं. पण लग्न करुनही त्या नीरज यांच्यापासून 27 वर्ष दूर राहिल्या, यामागचं कारण काय होतं? अलका आणि नीरज यांची भेट कशी झाली? याबाबत जाणून घेऊयात...

'पायल की झंकार' या चित्रपटातील 'थिरकता अंग लचक झुकी' या गाण्यानं अलका यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. अलका यांनी गायलेल्या गाण्यांना प्रेक्षकांची पसंती मिळत होती. अलका यांची शिलाँगचे उद्योगपती नीरज कपूर यांच्यासोबत एका रेल्वे स्टेशनवर ओळख झाली. आधी दोघांची मैत्री झाली आणि नंतर या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले.

1988 मध्ये नीरज आणि अलका यांनी आपल्या आई-वडिलांना त्यांच्या नात्याबाबत सांगितलं. दोघांच्या पालकांनी त्यांच्या नात्याला होकार दिला. 1989 मध्ये अलका आणि नीरज यांनी लग्नगाठ बांधली. अलका याज्ञिक या 27 वर्षांपासून पती नीरजपासून वेगळ्या राहात आहेत. अलक या करिअरसाठी मुंबईत रहात आहेत तर नीरज हे शिलाँगमध्ये रहात आहेत. दोघांमध्ये वाद होत असल्यानं दोघे वेगळे राहतात, अशी चर्चा अनेकदा होते.




# शेवटही कडू!

## स्मृती मानधनाच्या आरसीबीचा शेवटच्या सामन्यातही पराभव

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**स्मृती मानधनाच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची सुरुवातीही कडू झाली आणि शेवटही कडू झाला. आरसीबीला महिला प्रीमियर लीगमधील विजयासह त्यांची मोहीम संपवता आली नाही. त्यांना त्यांच्या शेवटच्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्ध चार गडी राखून पराभव पत्करावा लागला.**

मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संघाने आरसीबीला 20 षटकांत नऊ गडी गमावून 125 धावा केल्या. मधल्या षटकांमध्ये मुंबईला पराभवाचा धक्का बसला, पण 16.3 षटकांत 6 बाद 129 अशी मजल मारली.

या सामन्यातील विजयानंतर मुंबई इंडियन्सचा संघ अव्वल स्थानी पोहोचला असला तरी थेट अंतिम फेरीत पोहोचणार की नाही, हे दिल्ली कॅपिटल्स आणि यूपी वॉरियर्स यांच्यातील सामन्याने ठरणार आहे. मुंबईला दोन गुण मिळाले आणि त्यांच्या खात्यात आता एकूण 12 गुण आहेत. दिल्ली कॅपिटल्सचे 10 गुण आहेत. त्याला यूपी वॉरियर्सविरुद्ध खेळायचे आहे. दिल्लीने पुढचा सामना जिंकल्यास उत्तम नेट रनरेट असलेला संघ अव्वल स्थानावर असेल.

सलामीवीर हिली मॅथ्यूज आणि यास्तिका भाटिया यांनी मुंबई इंडियन्सला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी 53 धावांची भागीदारी केली. यास्तिका 30 आणि मॅथ्यूज 24 धावांवर बाद झाले. हे दोघे बाद झाल्यानंतर संघाला काही अंतराने सतत धक्के बसत राहिले.नताली सीवर ब्रंट 13 आणि कर्णधार हरमनप्रीत कौर दोन धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतल्या. इथून सामना फिरेल असे वाटत होते, पण अमेलिया केर आणि पूजा वस्त्राकर यांनी तसे होऊ दिले नाही. पूजा 18 चेंडूत 19 धावा करून बाद झाली, मात्र तोपर्यंत तिने संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणले होते.

इस्सी वोंग खाते उघडू शकले नाही. अमेलिया केरने 27 चेंडूत नाबाद 31 धावा करत मुंबईला विजय मिळवून दिला. आरसीबीकडून मेगन शुट, श्रेयंका पाटील, एलिस पेरी आणि आशा शोभना यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूची सुरुवात खराब झाली. सोफी डिव्हाईन पहिल्याच षटकात धावबाद झाली. यानंतर अमेलिया कारने बंगळुरूला तीन धक्के दिले. त्याने प्रथम कर्णधार स्मृती मानधनाला झेलबाद केले.

### अशा प्रकारची खेळी...

**मंधाना 24 धावा करू शकली. यानंतर हीदर नाइटला झेलबाद केले. तिला 12 धावा करता आल्या. कनिका आहुजाला अमेलियाने यष्टिरक्षक यस्तिकाच्या हातून त्रिफळाचीत केले. कनिकाला 12 धावा करता आल्या. एलिस पेरीला नॅट सीव्हर ब्रंट एलबीडब्ल्यू केले, तिला 38 चेंडूंत तीन चौकारांच्या मदतीने 29 धावा करता आल्या. त्याचवेळी श्रेयंका पाटील चार धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. इस्सी वाँगने 20 व्या षटकात ऋचा घोष आणि दिशा कासट यांना बाद केले. रिचा 13 चेंडूंत तीन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने 29 धावा करून बाद झाली.**

# चेन्नईत हरलो तर...

## केवळ मालिकाच नाही तर सत्ताही धोक्यात!

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**टीम इंडियाने मुंबईत विजय मिळवला आणि ऑस्ट्रेलियाने विशाखापट्टणममध्ये जोरदार पुनरागमन केले. तीन सामन्याच्या एकदिवसीय मालिका 1-1 अशी बरोबरीत असून आता चेन्नई वनडेत विजेत्याचा निर्णय होईल. बुधवारी तिसरा सामना खेळला जाणार असून हा सामना जिंकण्यासाठी दोन्ही संघ जीवाची बाजी लावणार आहेत. एकदिवसीय मालिकेतील विजेता चेन्नईत निश्चित होणार आहे आणि आयसीसीचा नंबर 1 संघ देखील या सामन्याद्वारे निश्चित होईल.**

सध्या टीम इंडिया हा वनडेमध्ये पहिल्या क्रमांकाचा संघ आहे, मात्र जर ते चेन्नईमध्ये पराभूत झाले तर त्यांच्या हातून नंबर 1 ची खुर्ची हिसकावून घेतली जाऊ शकतो. जर टीम इंडिया चेन्नईमध्ये हरली तर ऑस्ट्रेलिया आणि भारताचे 113-113 रेटिंग गुण होतील. पण कांगारू आघाडीवर असतील कारण ते एव्हरेजने गुणांसह टीम इंडियाच्या पुढे असतील. अशा परिस्थितीत भारताला आपला नंबर 1 ताज वाचवायचा असेल, तर चेन्नईमध्ये विजय मिळवणे त्याच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.तसे, जर टीम इंडिया चेन्नईमध्ये जिंकली तर त्याचा रेटिंग पॉइंट 115 होईल. यासह ती पहिल्या क्रमांकावर राहील परंतु ऑस्ट्रेलियन संघ 2 स्थानांनी खाली घसरून चौथ्या



स्थानावर पोहोचेल. या प्रकरणात न्यूझीलंड दुसऱ्या आणि इंग्लंड संघ तिसऱ्या स्थानावर पोहोचेल.

दोन्ही संघ चेन्नई वनडे जिंकण्याचा प्रयत्न करतील हे स्पष्ट आहे कारण मालिकेव्यतिरिक्त रँकिंग देखील धोक्यात आहे. मिचेल स्टार्क आणि मिचेल मार्श यांनी मालिका खूपच रोमांचक बनवली आहे. विशाखापट्टणममध्ये पराभूत झालेली टीम इंडिया चेन्नईमध्ये कशी पुनरागमन करते हे पाहणे बाकी आहे. चेन्नईच्या खेळपट्टीवर टीम इंडियाला अधिक मदत मिळू शकते कारण तिथे स्पिनर्सचे वर्चस्व असते. त्याच वेळी गेल्या दोन सामन्यांमध्ये वेगवान गोलंदाजांसाठी अनुकूल खेळपट्टी होती, ज्याचा फायदा ऑस्ट्रेलिया आणि भारत या दोन्ही संघांनी घेतला.

# जागतिक महिला बॉक्सिंग स्पर्धेत साक्षी लवलिना उपांत्यपूर्व फेरीत

। नवी दिल्ली महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

**आशियाई ब्राँझपदक विजेती साक्षी चौधरी व टोकियो ऑलिंपिक ब्राँझपदक विजेती लवलिना बोगहिन या भारताच्या दोन महिला खेळाडूंनी जागतिक महिला बॉक्सिंग स्पर्धेमध्ये आपआपल्या गटात प्रतिस्पर्थ्यांना जोरदार ठोसे मारत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. भारताच्या प्रीती हिचे आव्हान मात्र सोमवारीच संपुष्टात आले.**

२३ वर्षीय साक्षी हिने ५२ किलो वजनी गटात कझाकस्तानच्या झाझीरा उरकबायेवा हिच्यावर ५-० असा दणदणीत विजय मिळवला. हरयानाच्या साक्षीसमोर कझाकस्तानच्या खेळाडूचा निभाव लागला नाही. साक्षीने आक्रमक खेळ करीत या लढतीत



सहज विजय मिळवला हे विशेष. लवलिना हिने मेक्सिकोच्या वेनिसा ओटींझ हिला ५-० असे नमवले. लवलिना हिने ७५ किलो वजनी गटात प्रतिस्पर्धी खेळाडूला अगदी सहज हरवले. लवलिना व वेनिसा यांच्यामधील लढत एकतर्फी झाली. साक्षी व लवलिना यांनी अंतिम आठमध्ये प्रवेश केला. मात्र प्रीती हिला थायलंडच्या जितपोंग जुतामस हिच्याकडून ४-३ असे पराभूत व्हावे लागले. प्रीती हिने ५४ किलो वजनी गटात कडवी झुंज दिली. पण तिला विजय मिळवता आला नाही. रिव्यूनंतर या लढतीचा निकाल लावण्यात आला.